# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

## नगरसचिव कार्यालय

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकाराचा वापर करुन मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेले दिनांक २४/१२/२०२४ चे ठराव**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८१३** | **विषय क्रमांक - ८१३**

**दिनांक - २४/१२/२०२४** | **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८१३<br>दिनांक -<br>२४/१२/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र. स्था/PMAYप्र/५९०/२०२४, दि.२४/१२/२०२४ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेतील किवळे येथील आरक्षण क्र.४/११९ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरे (EWS) या मिळकतीवर बांधण्यात आलेल्या सदनिकांकरीता लाभार्थी हिस्सा निश्चित करणेबाबत. |
| ठराव क्र. ८१३<br>दिनांक -<br>२४/१२/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र. स्था/PMAYप्र/५९०/२०२४, दि.२४/१२/२०२४ अन्वये मौजे किवळे, तालुका – हवेली, जिल्हा-पुणे येथील स.नं.७३/१/१/२/१ व स.नं.७३/१/१/२/३ या मिळकतीपैकी आरक्षण क्र.४/११९ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (EWS) या आरक्षणाने बाधित एकुण क्षेत्र ७५४१.१२ चौ.मी. इतका आहे. सदर मिळकतीबाबत UDCPR चे नियम क्र.११.२.४ व नियम क्र.११.२.५ चे नियमावलीनुसार Construction Amenity TDR च्या बदल्यात आरक्षण विकसित करुन आर्थिक दुर्बल घटकांसाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ताब्यात देणेकामी मे.परफेक्ट अॅड्रेस एल.एल.पी. यांनी दि.१८/११/२०२१ रोजी मा.शहर अभियंता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडे प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावास दि.०१/०१/२०२२ रोजी मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी मान्यता दिलेली आहे.<br>सदर आरक्षण विकसित करुन आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरे बांधून पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या ताब्यात मे.परफेक्ट अॅड्रेस एल.एल.पी. देणार आहेत. सदरच्या प्रकल्पांतर्गत महानगरपालिकेस आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी ७५५ सदनिका वाटप करणेकामी उपलब्ध होणार आहेत.<br>सद्यस्थितीत सदर प्रकल्पाचे काम पुर्ण झाल्यानंतर सदनिका वाटप करणेकामी महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात येणार आहे. त्यामुळे सदर सदनिकांसाठी लाभार्थी हिस्सा निश्चित करणे आवश्यक आहे. प्रकल्पाच्या एकुण बांधकामाच्या किंमतीनुसार येणारा लाभार्थी हिस्सा खालीलप्रमाणे. |

| अ.क्र. | प्रकल्पाचे नाव | एकुण सदनिका | प्रकल्पाची किंमत (घरे बांधणे या कामासाठी) | GST 18% (एकुण प्रकल्प किंमतीवर) | एकुण प्रकल्प किंमत (GST सह) | एका सदनिकेची किंमत (६ / ३) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | किवळे | ७५५ | ८३२२३८९२६.०० | १४९८०३००७ | ९८२०४१९३३ | १३००७१८ |

यापुर्वी महानगरपालिकेमार्फत प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत राबविणेत आलेल्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी राबविणेत आलेल्या चऱ्होली, बोऱ्हाडेवाडी, आकुर्डी व पिंपरी प्रकल्पांसाठी निविदा स्वीकृत दरानुसार लाभार्थी हिस्सा निश्चित करणेत आलेला आहे. तथापि, विषयांकीत प्रकल्पासाठी प्रकल्पाच्या बांधकामाच्या एकुण किंमतीवर (GST सह) लाभार्थी निश्चित करावा लागणार आहे.

| | |
|---|---|
| | सबब वरील तक्त्यामध्ये नमुद केलेप्रमाणे प्रति सदनिका र.रु.१३,००,७१८/- ही रक्कम विषयांकीत प्रकल्पाच्या सदनिकांकरीता लाभार्थी हिस्सा म्हणून निश्चित करणेच्या प्रस्तावास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८१४** **विषय क्रमांक - ८१४**

**दिनांक - २४/१२/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८१४ दिनांक - २४/१२/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र. साप्रवि/२/कावि/८५०/२०२४ दि. २४/१२/२०२४ अन्वये, 'कार्यकारी अभियंता (स्थापत्य)' पदावरील पदोन्नतीस मान्यता देणेबाबत. |
| ठराव क्र. ८१४ दिनांक - २४/१२/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र. साप्रवि/२/कावि/ ८५० /२०२४ दि. २४/१२/२०२४ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर 'कार्यकारी अभियंता (स्थापत्य)' अभिनामाचे २४ पदे पे. लेवल S-२३ वेतनश्रेणी ६७७००-२०८७००मध्ये शासन मंजूर आहे.<br>'कार्यकारी अभियंता (स्थापत्य)' अभिनामाची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याकामी मा.आयुक्तसो यांच्या अध्यक्षतेखाली पदोन्नती समिती सभा दिनांक २४/१२/२०२४ रोजी आयोजित करण्यात आलेली होती.<br>पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार 'कार्यकारी अभियंता (स्थापत्य)' पदोन्नतीच्या निकटतम निम्न पदावरील शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, शिस्तभंग आणि मत्ता व दायित्वाची माहिती, संगणक अर्हता इ. सेवाविषयक तपशील पडताळून शासन निर्णय दि.०७/०५/२०२१ मधील मार्गदर्शक तरतुदींनुसार तसेच स्थापत्य अभियंता संवर्गातील सेवाज्येष्ठता व पदोन्नती संदर्भात न्यायप्रविष्ठ असलेल्या सर्व याचिकांमधील अंतिम निर्णयास अधिन राहून खालील अधिकारी यांना मागासवर्गीयांचे पदोन्नतीतील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात न्यायप्रविष्ट विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील निर्णय तसेच मा.महापालिका सभेच्या मान्यतेने 'कार्यकारी अभियंता (स्थापत्य)' अभिनामाचे रिक्त पदांवर पे.लेवल S-२३ वेतनश्रेणी ६७७००-२०८७०० मध्ये तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्याबाबत समितीने सर्वानुमते शिफारस केली आहे. |

| अ.क्र | दि.३१/१२/२००७ रोजीच्या सेवाज्येष्ठता यादीतील क्रम दिनांक २५/०५/२००४ रोजीची स्थिती गृहित धरुन | उपअभियंता पदावरील अधिका-यांचे नांव | पदवी/ पदवीका बिंदू निहाय क्रम | पदोन्नतीचा प्रवर्ग | शेरा |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | विचारात घेतलेला क्रमांक | | | | |
| १ | ३३ | मुठाळ चंद्रकांत शामराव | पदवी | ज्येष्ठतेनुसार | |
| २ | ३४ | साळी संजय दत्तात्रय | पदवी | ज्येष्ठतेनुसार | |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ नुसार महानगरपालिकेचा जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये निहित आहे. त्यानुसार प्रस्तुत विषयास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| | |
|---|---|
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८१५** **विषय क्रमांक - ८१५**

**दिनांक - २४/१२/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८१५<br>दिनांक -<br>२४/१२/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र. साप्रवि/९/कावि/१११६/२०२४ दि. २४/१२/२०२४ अन्वये श्री. दांगट श्रीनिवास रामचंद्र, सहाय्यक आयुक्त यांना मनपा सेवेतुन बडतर्फ़ करणेबाबत. |
| ठराव क्र. ८१५<br>दिनांक -<br>२४/१२/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र. साप्रवि/९/कावि/१११६/२०२४ दि. २४/१२/२०२४ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर श्री. दांगट श्रीनिवास रामचंद्र हे “सहाय्यक आयुक्त” या गट-अ दर्जाच्या पदावर समाज विकास विभागात कार्यरत आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील “प्रशासन अधिकारी” अभिनामाची सरळसेवेची रिक्त पदे भरणेकामी जाहिरात क्र.९३/२०१३ दिनांक २९/०७/२०१३ रोजी वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात येऊन या पदाची अर्हता धारण करीत असलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविणेत आलेले होते. प्रकरणी दि-१४/१०/२०१३ च्या आदेशान्वये सरळसेवेने अटी व शर्तीचे अधीन राहुन श्री. दांगट श्रीनिवास रामचंद्र यांना “प्रशासन अधिकारी” या ग़ट “ब” च्या पदावर नियुक्ती देण्यात आलेली आहे. सदर आदेशातील अट क्र ८ नुसार सेवेत रुजु होतांना महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ नुसार प्रतिज्ञापन सादर करणे आवश्यक व बंधनकारक आहे. तथापि वेळोवेळी कळवुनही त्यांनी लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर केलेले नाही. यास्तव त्यांचेविरुध्द दि-३०/०८/२०२१ च्या आदेशान्वये विभागीय चौकशी होवुन चौकशीत त्यांचे विरुध्द ३ अपत्ये असल्याचा दोषारोप शाबीत झालेला आहे. प्रकरणी श्री.दांगट श्रीनिवास रामचंद्र,सहाय्यक आयुक्त यांचे नियुक्ती प्राधिकारी महापालिका सभा असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५६(१) (अ) मधील तरतुदीनुसार त्यांना सेवेतुन कमी करणेकामी प्रस्तुत विषयास मा.महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक आहे.<br>ज्याअर्थी, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील परिपत्रक क्र. एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२ दिनांक १ जुलै २००५ मधील तरतुदी व प्रकरणाच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या तक्रारी विचारात घेवुन श्री. दांगट श्रीनिवास रामचंद्र, सहा. आयुक्त तथा क्षेत्रिय अधिकारी यांना महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ नुसार र.रु.५००/- चे स्टॅम्पवर प्रतिज्ञापन सादर करणेकामी वेळोवेळी कळविणेत आलेले होते. तथापि श्री.दांगट यांनी लहान कुंटूबाचे प्रतिज्ञापन सादर न केल्याने दि-३०/०८/२०२१ च्या आदेशान्वये त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु करणेत आलेली होती. आणि ज्याअर्थी, प्रस्तुत प्रकरणी |

विभागीय चौकशी होवुन चौकशीचा अहवाल दि-१८/०७/२०२२ रोजी प्राप्त झालेला आहे. त्यामध्ये चौकशी अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविलेले आहे. दोषारोप पत्रामधील मुळ दोषारोप ३ अपत्ये असल्यामुळे नियुक्तीस अपात्र ठरतात तसेच ३ अपत्ये असल्याचे अपचारी यांनी कबुल केले आहे. त्यामुळे अन्य कागदपत्रामुळे दोषारोप सिध्दतेवर कोणताही परिणाम होत नाही. महाराष्ट्र शासनाकडील दि-०१/०७/२००५ च्या परिपत्रकानुसार दि-२८/०३/२००६ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असल्यास सबंधित उमेदवाराचा नेमणुकीकरिता विचार केला जाणार नाही व तसे विहित नमुन्यात र.रु.१००/- चे स्टॅम्पवर नोटराईज केलेले अपत्याबाबतचे प्रतिज्ञापन नियुक्तीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. सदर जाहीरातीची अट विचारात घेता श्री. दांगट हे प्रशासन अधिकारी पदावर रुजु होतांनाच विहित नमुन्यात र.रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन नियुक्तीच्या वेळी सादर करणे ही त्यांची जबाबदारी होती. असा अंतिम निष्कर्ष चौकशी अधिकारी यांनी नोंदवुन त्यांचेविरुध्द सर्व दोषारोप शाबीत झाल्याचे अहवालात नमुद केले आहे.

आणि ज्याअर्थी श्री. दांगट यांनी दि-२६/०८/२०२२ अन्वये विभागीय चौकशी अहवालावरील आपले अभिवेदन सादर केलेले आहे. त्यामध्ये चौकशी अधिकारी यांनी काढलेले निष्कर्ष मोघम व निराधार स्वरुपाचे असल्याने विभागीय चौकशी नियम पुस्तिका १९९१ मधील प्रकरण ७ नुसार चौकशी अहवालाचे परिक्षण करणेबाबत विनंती केलेली आहे. तथापि चौकशी अधिकारी यांनी नोंदविलेले निष्कर्ष व शासन परिपत्रक/आदेशातील तरतुदी स्वयंस्पष्ट असल्याने चौकशी अहवालाचे परिक्षण करणेची आवश्यकता नाही.

आणि ज्याअर्थी, सामान्य प्रशासन विभागाकडील दि-१२/१०/१९९३ च्या शासन निर्णयानुसार, एखादा शासकिय कर्मचारी शासन सेवेतील मुळ नेमणुकीसाठी सबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीप्रमाणे पात्र न होता वा विहित अहर्ता प्राप्त न होता अथवा त्यांनी नेमणुक मिळवण्यासाठी खोटी माहिती दिली होती. अशा कर्मचा-यास शासकिय सेवेत ठेवण्यात येवु नये त्यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ नुसार विभागीय चौकशी करुन आरोप सिध्द झाल्यास त्या शासकिय कर्मचा-यास सेवेतुन काढुन टाकावे परंतु कोणत्याही परिस्थितीत यापेक्षा वेगळी शिक्षा लादु नये. अशी तरतुद आहे.

आणि ज्याअर्थी, सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयाचे विधीतज्ञ श्री. केदार दिघे यांचे अभिप्राय घेणेत आलेले आहे. विधीतज्ञ श्री. केदार दिघे यांनी त्यांचा अभिप्राय दि. ०९/१२/२०२४ रोजी सादर केलेला आहे. त्यामध्ये श्री. दांगट यांना विभागीय चौकशीमध्ये यापुर्वीच संबंधित नियम, तरतुदीनुसार दोषी धरण्यात आलेले आहे. त्यामध्ये लहान कुटुंब (दोन पेक्षा अधिक अपत्य असणे) अंतर्भुत असुन त्या नियमांचे उल्लघंन केल्यास शास्तीची तरतुद करण्यात आलेली आहे. त्यामुळे मा. आयुक्त हे प्रशासक यांचे अधिकारात जर खातेनिहाय चौकशी पश्चात एखाद्या शासकिय कर्मचा-यास दोषी धरुन त्यांना सेवेतुन बडतर्फ करीत असतील तर सदरची मा. आयुक्त यांची प्रशासक म्हणून केलेली कृती ही नैसर्गिक न्याय तत्वाच्या विरुध्द केली असा अर्थ निघत नाही. असा अभिप्राय दिलेला असुन सदर अभिप्रायाशी मा. कायदा सल्लागार सहमत असल्याचे त्यांचेकडील दि. ०९/१२/२०२४ च्या पत्रान्वये कळविले आहे. यावरुन श्री. दांगट यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम ३(१) (एक) (दोन) (तीन) व महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील दि-०१ जुलै २००५ मधील परिपत्रकातील तरतुदीचा व महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील दि-२८ मार्च २००५ मधील अधिसुचनामधील नमुद तरतुदीचा व नियुक्ती आदेशातील अट क्र ८ चा भंग केलेला आहे.

सबब, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील दि-०१ जुलै २००५ मधील परिपत्रकातील तरतुदी, विभागीय चौकशीमध्ये तीन अपत्ये असलेबाबतचा शाबीत झालेला दोषारोप, शासन निर्णय दि-१२/१०/१९९३ मधील नमुद तरतुदी, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या दि-१८/०२/२०२० रोजीच्या सेवाप्रवेश नियमातील नियम १२ (च) मधील तरतुद व ॲड. केदार दिघे, विधीतज्ञ मुंबई हायकोर्ट व मा. कायदा सल्लागार यांचा अभिप्राय विचारात घेता, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५६ (२) (ग) व महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम 1979 मधील नियम (5) (आठ) मधील तरतूदीनुसार श्री. दांगट श्रीनिवास रामचंद्र, सहाय्यक आयुक्त यांना मनपा सेवेतुन कमी करणेकामी मा. महापालिका सभेची मान्यता आवश्यक असल्याने त्यास मा. प्रशासक यांची मंजुरी देण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| निर्णय | महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली. |

**सही/-**
(चंद्रकांत पोपट इंदलकर)
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**सही/-**
(शेखर सिंह)
मा.प्रशासक
पिंपरी चिंचवड महानगरपालिका